# महाराष्ट्र शासन

क्रमांक:- संकीर्ण २०१७/प्र.क्र.१३६/गृनिप
गृहनिर्माण विभाग,
मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई:- ४०० ०३२
दिनांक :- ०३ जून, २०१७

प्रति,

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई:- ४०० ०५१.

विषय:- वि.नि.नि. ३३ (५) अन्वये म्हाडा वसाहतीमधील इमारतींच्या पुनर्विकासा- करिताचे अधिमुल्य हप्त्या-हप्त्याने भरण्याची मुभा मिळणेकरिता महाराष्ट्र चेंबर्स ऑफ हौसिंग इंडस्ट्रीज यांची विनंती.

संदर्भ:- आपले पत्र क्र. नि.का.अ./ मु.मं/ मु.का.अ. /प्रा.५६७/ २०१७,
दि. २७.०४.२०१७

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतच्या आपल्या संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने नमूद करण्यांत येते की, म्हाडाचा ठराव क्र.६२६० दि.०४.०६.२००७ अन्वये अधिमूल्याचे दर तसेच अधिमूल्य रक्कम भरण्याची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे. त्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करावयाची असल्यास म्हाडा प्राधिकरणाने ठराव करुन तशी सुधारणा करणे आवश्यक आहे. यासंदर्भात नगर विकास विभागानेही अंमलात असलेल्या नियमानुसार जे काही अधिमूल्य वसूल करावयाचे आहे त्यासंदर्भात कार्यपध्दती प्राधिकरणाने निश्चित करावयाची आहे, त्यामुळे म्हाडा प्राधिकरणाने प्रथमत: त्यांचे धोरण निश्चित करावे असे अभिप्राय दिलेले आहेत. ही वस्तुस्थिती विचारात घेता सदर प्रकरणी म्हाडा प्राधिकरणाच्या स्तरावर ठराव करुन धोरण निश्चित करण्यांत यावे, असे आपणांस कळविण्यांत येत आहे.

आपला,

(म. रा. पारकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन